**ठळक बातम्या**

- मुंबई महापालिका निवडणुकीसाठी उद्धव आणि राज ठाकरे यांच्याकडून युतीची घोषणा

- महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणूक काँग्रेस, राष्ट्रीय समाज पक्षासोबत लढणार, वंचित बहुजन आघाडीसोबत निवडणूक लढवण्यावर संभ्रम

- जिल्हा परिषदेतल्या कंत्राटी आरोग्य सेविकांना नियमित करण्याचा राज्य मंत्रीमंडळाचा निर्णय, नगराध्यक्षांनाही मताधिकार मिळणार

- नवी मुंबई विमानतळ उद्यापासून प्रवासी वाहतुकीसाठी खुलं होणार

**आणि**

- चांदीची विक्रमी वाटचाल सुरूच, एका दिवसात ८ हजार रुपयांनी महाग होऊन किलोमागे सव्वा २ लाख रुपयांच्या पुढे

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना मुंबई महापालिकेची निवडणूक एकत्र लढवणार असल्याची अधिकृत घोषणा आज झाली. उद्धव आणि राज ठाकरे यांनी मुंबईतल्या वार्ताहर परिषदेत याची माहिती दिली. याविषयी राज ठाकरे म्हणाले….

**होल्ड राज ठाकरे १**

मुंबईचा पुढचा महापौर मराठीच असेल आणि आमचाच असेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पण जागा वाटप आणि अन्य माहिती देणं टाळलं.

**होल्ड राज ठाकरे २**

नाशिक महापालिकेसाठी युती झाली असून उर्वरित महापालिकांच्या संदर्भात एक-दोन दिवसांत शिक्कामोर्तब होईल, असं उद्धव ठाकरे म्हणाले. मराठी माणूस आणि मुंबईच्या रक्षणासाठी ही युती झाल्याचं त्यांनी सांगितलं.

**होल्ड उद्धव ठाकरे ३**

महाविकास आघाडी कायम असली तरी महापालिका निवडणुकांसाठी आमच्या दोन्ही पक्षांची युती झाली आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले. काँग्रेसनं मुंबई महापालिकेच्या निवडणुका स्वतंत्र लढवण्याची घोषणा केली असून शरद पवारांच्यासोबत वाटाघाटी सुरू असल्याची माहिती उद्धव ठाकरे यांनी दिली.

**<><><><><>**

कोल्हापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं आज युतीची घोषणा केली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षासोबत आघाडीसाठी चर्चा सुरू असल्याचं काँग्रेस नेते सतेज पाटील यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महापालिका निवडणुकींसंदर्भात महायुतीची घोषणा लवकरच होईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज मुंबईत वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. उद्धव आणि राज ठाकरे यांच्या युतीबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला, पण महायुतीच्या कामगिरीवर याचा फार काही परिणाम होईल, असं वाटत नसल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली.

**होल्ड - मुख्यमंत्री बाइट**

**<><><><><>**

महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणूका एकत्र लढवण्याचा निर्णय काँग्रेस आणि राष्ट्रीय समाज पक्षानं आज जाहीर केला. मुंबईत राष्ट्रीय समाज पक्षाचे

अध्यक्ष महादेव जानकर आणि काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यात चर्चा झाली. त्यानंतर दोघांनी हा निर्णय जाहीर केला.

<><><><><>

मुंबई महापालिकेची निवडणुक वंचित बहुजन आघाडीसोबत लढवण्याचा निर्णय झाल्याचं काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी आज जाहीर केलं. दोन्ही पक्षात जागावाटपाच्या संदर्भात स्थानिक परिस्थिती पाहून निर्णय घेतला जाईल. पण कुठेही निम्म्या - निम्म्या जागा वाटपाची मागणी झाली नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. याविषयी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले…

**बाइट हर्षवर्धन सपकाळ**

वंचित बहुजन आघाडीनं मात्र यावर वेगळी भूमिका घेतली आहे. वडेट्टीवार यांचे युती संदर्भातलं वक्तव्य चुकीचं आणि जनतेत संभ्रम निर्माण करणारं आहे, पक्षाच्या राज्य समितीचे सदस्य जितरत्न पटाईत म्हणाले. काँग्रेससोबत अजून आघाडी झालेली नाही आणि झाली तर त्याचा निर्णय बाळासाहेब आंबेडकर आणि पक्षातले वरिष्ठ नेते घेतील, असं ते म्हणाले.

<><><><><>

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे शहर अध्यक्ष प्रशांत जगताप यांनी आज पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला. समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे त्यांनी ही घोषणा केली.

<><><><><>

ठाणे शहराच्या मतदार यादीत ८५ हजार मतदारांची नावं एकाहून अधिक वेळा असल्याचं आढळून आलं आहे, असं ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव यांनी आज स्पष्ट केलं. या नावांबद्दल उद्या  दुपारपर्यंत निर्णय होईल, असंही ते म्हणाले.

<><><><><>

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात कंत्राटी तत्त्वावर कार्यरत असलेल्या आरोग्य सेविकांना नियमित करण्याचा निर्णय राज्य मंत्रीमंडळानं आज घेतला. १५ एप्रिल २०१५ पूर्वी नियुक्त झालेल्या, कार्यरत आणि सेवानिवृत्त झालेल्या २९१ आरोग्य सेविकांना याचा लाभ मिळेल. मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. नगरपरिषदा आणि नगरपंचायत निवडणुकीत थेट निवडून आलेल्या नगराध्यक्षांना संबंधित सभागृहाचं सदस्यत्व देण्याचा निर्णयही राज्य सरकारनं घेतला आहे. त्यांना मतदानाचा अधिकारही दिला जाणार आहे. यासंदर्भातला अध्यादेश काढायला राज्य मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली. या सुधारणेनुसार आता अध्यक्ष म्हणून थेट निवडून आलेली व्यक्ती आणि सदस्य म्हणून थेट निवडून आलेली व्यक्ती एकाचवेळी दोन्ही पदं धारण करू शकेल. तसंच अध्यक्षाला सदस्य म्हणून एक मत देण्याचा अधिकार मिळणार आहे. अशा व्यक्तीला अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून एक मत देण्याचा अधिकार असेल आणि मतांची बरोबरी झाल्यास, अध्यक्षाला निर्णायक मत देण्याचा अधिकार राहणार आहे, अशी सुधारणा या अधिनियमात केली जाणार आहे. जिल्हा कर्मयोगी योजनेचा दुसरा टप्पा आणि सरपंच संवाद कार्यक्रमही राज्य सरकार राबवणार आहे.

<><><><><>

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उद्यापासून प्रवासी वाहतुकीसाठी खुलं होणार आहे. उद्या पहिल्या दिवशी ३० विमानांची ये-जा होणार असून सुमारे ४ हजार प्रवासी यातून प्रवास करतील, अशी माहिती सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी आज वार्ताहर परिषदेत दिली. सकाळी ८ वाजता पहिलं प्रवासी विमान धावपट्टीवर उतरेल, तर ८ वाजून ४५ मिनिटांनी पहिलं विमान उड्डाण करेल. यासोबतच मालवाहतूक सेवाही सुरू होणार असल्याचं सिंघल यांनी सांगितलं. विमानांचा आकडा १५ जानेवारीपर्यंत वाढत जाऊन रोज ४८

उड्डाणांपर्यंत पोहोचेल. सध्या ही सेवा फक्त देशांतर्गत राहील, तर मार्च महिन्यापर्यंत आंतरराष्ट्रीय विमानसेवेपर्यंत विस्तारली जाईल, असं ते म्हणाले.

<><><><><>

गेल्या काही दिवसांपासून नवनवे विक्रमी गाठणारी चांदी आज किलोमागे सुमारे ८ हजार रुपयांनी महागली. यामुळं मुंबईच्या बाजारपेठेत करांसह एक किलो चांदीसाठी सव्वा २ लाख रुपयांहून अधिक रक्कम मोजावी लागत होती. २२ आणि २४ कॅरेट सोनं आज किरकोळ महाग झालं. एक तोळा २२ कॅरेट सोन्यासाठी आज १ लाख ४० हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम मोजावी लागत होती.

<><><><><>

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री सुरूपसिंग नाईक यांचं आज नंदुरबार जिल्ह्यामधल्या नवापूर इथं निधन झालं. ते ८८ वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर नवापूर इथल्या रुग्णालयात उपचार सुरू होते.

सुकवेल गट ग्रामपंचायतीच्या सरंपचपदापासून नाईक यांच्या राजकीय कारकीर्दीला सुरुवात झाली. १९७८ पासून त्यांनी नवापूर विधानसभा मतदारसंघाचं अनेकवेळा प्रतिनिधित्व केलं. तसंच समाजकल्याण, आदिवासी विकास, सार्वजनिक बांधकाम, वन आणि बंदरे आदी खात्यांचे मंत्री म्हणूनही त्यांनी काम पाहिलं.

<><><><><>

मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी काल किमान तापमानात लक्षणीय घट झाली. कोकणात तुरळक ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित घट झाली. येत्या दोन दिवसांत राज्यातलं हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//